20 JUL 2022 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ. कोल्हापूर

# ऑफलाईन एमसीक्यू परीक्षेला १३७७ विद्यार्थी

## शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षांना प्रारंभ; ३३ विषयांच्या परीक्षा सुरळीत

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल २०२२ उन्हाळी सत्राच्या विद्यापीठ स्तरावरील ५६१ परीक्षांपैकी ७८ परीक्षांना मंगळवारपासून एमसीक्यू ऑफलाईन पद्धतीने सुरळीतपणे सुरुवात झाली. ३३ विषयांची १ हजार ३७७ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली.

विद्यापीठ परीक्षा विभागाच्या वतीने विद्यापीठ विद्या परिषदेच्या मान्यतेनुसार सर्व ७४१ परीक्षा ऑफलाईन एमसीक्यू पद्धतीने घेतल्या जाणार आहेत. १९ जुलैपासून पहिल्या टप्प्यातील ७८ अभ्यासक्रमांच्या परीक्षांना सुरुवात



झाली. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील २७६ महाविद्यालयांना 'एसआरपीडी' मोडद्वारे 'ओएमआर' शीटवर परीक्षा घेण्यात आल्या.

**१८६ परीक्षांचे निकाल घोषित**

महाविद्यालयीन स्तरावरील झालेल्या १८६ परीक्षांपैकी आजअखेर विविध अभ्यासक्रमांचे निकाल घोषित करण्यात आले आहेत. यात बॅचलर ऑफ डिझाईन, फूड मॅनेजमेंट, बी.कॉम. बँक मॅनेजमेंट, बीसीए सत्र १ व २ यांचा समावेश आहे. विद्यापीठाने परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. पथकाकडून गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांची नोंद करून परीक्षा प्रमाद समितीमार्फत नियमानुसार कारवाई विद्यापीठामार्फत करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांनी परीक्षेचे पावित्र्य राखावे, दिलेल्या सूचनांप्रमाणेच परीक्षा द्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. ए. एन. जाधव यांनी केले आहे.

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठ परीक्षांना सुरुवात

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल उन्हाळी सत्राच्या विद्यापीठ स्तरावरील ५६१ पैकी ७८ परीक्षांना मंगळवारी सुरुवात झाली. एमसीक्यू ऑफलाईन पद्धतीने ३३ विषयाच्या परीक्षा झाल्या. १ हजार ३७७ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. या पथकांकडून प्रत्यक्ष नोंद करून परीक्षा प्रमाद समितीमार्फत नियमानुसार कारवाई करण्यात येणार आहे, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. ए. एन. जाधव यांनी दिले. महाविद्यालयीन स्तरावरील १८६ पैकी काही परीक्षांचे निकाल जाहीर झाले. यामध्ये बीडीएस सेमी, ड्रेस मेकिंग अॅण्ड फॅशन, बीएसस्सी फूड मॅनेजमेंट, बीआयडी सेमी, बी व्होक रिटेल मॅनेजमेंट, बी.कॉम बँक मॅनेजमेंट, बी.कॉम आयटी, बीसीए, बीएसस्सी या अभ्यासक्रमाच्या सेमिस्टर १ व २ चे निकाल जाहीर झाले.

20 JUL 2022 सकाळ जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# उन्हाळी सत्रातील परीक्षांना झाला प्रारंभ

## ऑफलाईन पद्धतीने बहुपर्यायी प्रश्नपत्रिका

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १९ : शिवाजी विद्यापीठाच्या मार्च, एप्रिल २०२२ च्या उन्हाळी परीक्षांना आज प्रारंभ झाला. ७४१ अभ्यासक्रमांपैकी ७८ परीक्षा सुरू झाल्या आहेत. या सर्व परीक्षा ऑफलाईन पद्धतीने आणि बहुपर्यायी प्रश्नपत्रिकांद्वारे होणार आहेत. एकूण १ लाख ४७ हजार ८०६ विद्यार्थी ही परीक्षा देणार आहेत.



कोरोनामुळे दोन वर्षांपासून शैक्षणिक वेळापत्रक बिघडले आहे. त्यामुळे उन्हाळी सत्रातील परीक्षा जुलै, ऑगस्टमध्ये होत आहेत. त्यातच विद्यार्थी संघटनांनी बहुपर्यायी प्रश्नपत्रिका असावी, अशी भूमिका घेतल्याने वेळापत्रक ऐनवेळी बदलावे लागले. विद्यापीठ प्रशासनाने सर्व परीक्षा ऑफलाईन आणि बहुपर्यायी प्रश्नपत्रिकेद्वारे घेण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे पुन्हा नव्याने वेळापत्रक बनवणे, बहुपर्यायी प्रश्नपत्रिका काढणे हे करावे लागले. पर्यायाने परीक्षा पुढे गेल्या. अखेर आज (ता. १९) पासून परीक्षा सुरू झाल्या. ७४१ अभ्यासक्रमांच्या विद्यापीठस्तरीय ५६१ परीक्षा होणार असून त्यातील ७८ परीक्षांना प्रारंभ झाला. विद्यार्थ्यांना त्यांची रिसीट व प्रवेश पत्र विद्यापीठाच्या संकेतस्थळावर देण्यात आले आहे. परीक्षेत गैरप्रकार होऊ नये, यासाठी भरारी पथके नेमण्यात आली आहेत. परीक्षा सुरळीत आणि वेळेत पार पडतील असा विश्वास परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. ए. एन. जाधव यांनी व्यक्त केला आहे.

20 JUL 2022 तरुण भारत जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ वस्तुनिष्ठ ऑफलाईन परीक्षा सुरळीत

## ३३ विषयांसाठी १३७७ विद्यार्थ्यांनी दिली परीक्षा : १८६ विषयांचे निकाल जाहीर

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत मार्च-एप्रिल उन्हाळी ऑफलाईन वस्तुनिष्ठ परीक्षांना मंगळवारपासून सुरूवात झाली आहे. ५६१ परीक्षांपैकी ३३ विषयांच्या ७८ परीक्षा पार पडल्या असून १३७७ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. या परीक्षा सुरळीत पार पडल्या, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. ए. एन. जाधव यांनी दिली.



शिवाजी विद्यापीठ अंतर्गत उन्हाळी वस्तुनिष्ठ ऑफलाईन परीक्षांना मंगळवारपासून सुरूवात झाली. बी. एस्सी. कॉम्प्युटर सायन्स, फुड सायन्स अ‍ॅन्ड टेक्नॉलॉजी, शुगर टेक्नॉलॉजी, एन्व्हायरमेंट सायन्स, आयटी, बी.कॉम. आयटी, बिजनेस मॅनेजमेंट, बी. व्होक टुरिझम अ‍ॅन्ड सर्व्हीस इंडस्ट्री, ऑटोमोबाईल, मीडिया इन्व्हायरमेंट, सस्टेनेबल ॲग्रीकल्चर, बी. ए. मल्टीमीडिया, ड्रेस मेकिंग अ‍ॅन्ड फॅशन को-ऑर्डीनेशन, बीजी डिप्लोमा आदी विषयांची परीक्षा झाली. परीक्षांमध्ये गैरप्रकार होऊ नयेत म्हणून भरारी पथकांची स्थापना केली आहे. भरारी पथकाने गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर कारवाई केल्यास परीक्षा समितीमार्फत नियमानुसार कारवाई केली जाईल. परीक्षेसंदर्भात विद्यापीठाने दिलेल्या सुचनांचे पालन विद्यार्थ्यांनी करावे, असे आवाहन परीक्षा संचालक डॉ. जाधव यांनी केले आहे.

विद्यापीठ अंतर्गत महाविद्यालय स्तरावर झालेल्या १८६ परीक्षांचे निकाल आतापर्यंत जाहीर केले आहेत. यामध्ये बी. ए. ड्रेस मेकिंग अ‍ॅन्ड फॅशन को-ऑर्डीनेशन, बी. एस्सी. फुड मॅनेजमेंट, बी. व्होक. रिटेल मॅनेजमेंट, बी. कॉम. बँक मॅनेजमेंट आदी विषयांचा समावेश आहे.

20 JUL 2022 तरुण भारत जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# रेशीम उद्योगाने उभारले शेतकऱ्यांचे संसार...

- फिरत्या प्रयोगशाळेने दिलं रेशीम उद्योगाला बळ
- रेशीम शेतीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड
- आधुनिक प्रशिक्षणाबरोबर बाजारपेठही उपलब्ध

**अहिल्या परकाळे**

कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील प्राणीशास्त्र विभागाने 'रेशीमशास्त्र पदविका अभ्यासक्रम" व पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम सुरु केले. याचे शिक्षण ५४ शेतकऱ्यांनी घेऊन पारंपरिक शेतीला बगल देत रेशीम शेतीला प्राधान्य दिले. राष्ट्रीय कौशल्य केंद्राच्या प्रशिक्षणातून त्यांनी कौशल्ये विकसित केली. शास्त्रशुध्द शिक्षणाबरोबर बाजारपेठ उपलब्ध केल्यामुळे हजारो किलो रेशीम आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत पोहोचले अन् याद्वारे रेशीम उद्योगाने अनेक शेतकऱ्यांचे संसार उभारले आहेत. यात फिरत्या प्रयोगशाळेच्या मार्गदर्शनाचं बळही या उद्योगाला मिळतेय, हे विशेष होय.

जिल्ह्यात जवळपास ६० शेतकरी रेशीम शेती करतात. रेशीमशास्त्र अभ्यासक्रम ५४ शेतकऱ्यांनी पूर्ण केला आहे. यामध्ये तरूण, महिलांची संख्या उल्लेखनीय आहे. रेशीम अभ्यासक्रमातून शेतकऱ्यांच्या कौशल्याला तंत्रज्ञानाची जोड मिळाली अन् याचे बांधावर प्रशिक्षण दिल्याने उत्पन्नात वाढ होऊन शेतकऱ्यांची स्थिती सुधारली आहे.

विद्यापीठाने तुतीची लागवड, रेशीम किटकांचे संगोपन, तुती व रेशीम किटकांचे रोग आणि कीड व्यवस्थापन, बाजारपेठ आणि कोष विक्री व्यवस्थापन, रेशीम धागा आणि कापड निर्मितीसंदर्भात शेतकऱ्यांना बांधावर जाऊन प्रशिक्षण दिले. रेशीम शेतीला आधुनिक अभ्यासक्रमाची जोड मिळाली आहे.



जिल्हा नियोजन समितीने विद्यापीठातील रेशीमशास्त्र केंद्रास १ कोटी ३४ लाखांचे अनुदान दिले. त्यातून देशातील पहिले पथदर्शक प्रशिक्षण केंद्र येथे स्थापन झाले. येथे रेशीम अळ्या, अंडी, कोश प्रकार, विविध तंत्रज्ञान, तुती व रेशीम अळयांचे रोग व किडीवर नियंत्रणासंदर्भात माहिती मिळते. विविध उपकरणे, किटक संगोपनासाठी अद्ययावत मॉडेल, कोश प्रक्रिया, धागा निर्मितीचे तंत्रज्ञान, कापड निर्मिती, आंतरराष्ट्रीय दर्जाच्या कलाकृतीसंदर्भात प्रशिक्षण उपलब्ध आहे. केंद्रीय रेशीम केंद्राच्या मान्यतेने घेतलेल्या २५ लाखांच्या अद्ययावत मशिनरी विद्यापीठात उपलब्ध आहेत.

रेशीम शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर बांधावर जाऊन फिरत्या प्रयोगशाळेद्वारे उपाययोजना केल्या जातात. किडींचे निरीक्षण करून सुक्ष्म कीड दुर्बिणीतून दाखवून, नियंत्रणासंदर्भात मार्गदर्शन केले जाते. देशातील या पहिल्या फिरत्या प्रयोगशाळेतून रेशीम उद्योगासंदर्भात जागृती केली जात आहे.

## जिल्हाधिकाऱ्यांनी रेशीम शेतीला प्रोत्साहन दिले



जिल्हाधिकारी राहूल रेखावार, जिल्हा नियोजन अधिकारी विजय पवार यांनी रेशीमशास्त्र विभागाला मदत केली. अन् देशातले पहिले 'रेशीमग्राम" म्हणून यळगुड, बेले, कडगाव पैकी एक गाव जाहीर होणार आहे. उद्योगासाठी प्रोत्साहन म्हणून जिल्हाधिकारी भरीव मदत करणार आहेत. त्यांनी आरळी येथील अभिजित घाटगेंच्या धागा निर्मिती प्रकल्पाची पाहणी करून स्वयंचलित रेशीम धागा निर्मितीसाठी भरीव मदत करण्याचे आश्वासन दिले.

**डॉ. ए. डी. जाधव (रेशीमशास्त्र विभागप्रमुख, शिवाजी विद्यापीठ)**

## रेशीम शेतीत कोट्यावधी कमवण्याचा मानस



अभ्यासक्रमामुळे रेशीम शेतीतील बारकावे समजल्याने शास्त्रशुध्द पध्दतीने शेती करत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात ५ ते १४ लाखांपर्यंत वाढ झाली आहे. शेतकऱ्यांना शास्त्रशुध्द शिक्षण दिल्याने त्यांचा आत्मविश्वास वाढला आहे. रेशीम शेतीसाठीचे पुढील तंत्रज्ञान देण्याची मागणी कुलगुरूंकडे केली आहे. रेशीम उद्योग आता कोट्यावधीत कसा जाईल, यासाठी प्रयत्नशील आहे.

**बापू नहाने (उस्मानाबाद)**

Times of India

# SUK semester exam for 78 courses begins

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The semester exams of Shivaji University, Kolhapur, (SUK) for 78 courses began on Tuesday in offline multiple choice question (MCQ) format. More than 1,47,000 students appeared for the exam.

Dr Ajitsinh Jadhav, the director of the SUK exam and evaluation department, said, "Of the 561 university level examinations, summer semester exams for 78 BSc and BA courses began from July 19 at 276 colleges affiliated with SUK. The examination department has made all necessary preparations for conducting these examinations smoothly.

Exam schedules and hall tickets have been published on the university website. Flying squads have been formed to curb cheating during exams. A committee formed for examination discipline will take direct action against the students found misbehaving or cheating in the exam and their names will be registered. Exams for traditional courses like MSc, B Pharmacy, Engineering, etc will commence from July 25.

Mahesh Vhatkar, a 2nd-year BSc student, said, "After a long protest by various student bodies, the university decided to conduct the exams in offline MCQ format. Although there was a delay, the exams have commenced and the first paper was easy."